नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ३८ Issue - 38 | वार - गुरुवार दि. २ जुलै २०२६ Blow- Thursday Date 2 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पावसाचे थैमान; मुंबई, पुण्यासह राज्यात मुसळधार पाऊस

## मुंबईसह उपनगरे, ठाणे, नवी मुंबई, पुणे आणि कोकणात पावसाने अक्षरशः हाहाकार; जनजीवन विस्कळीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात मान्सून चांगलाच सक्रिय झाला असून गेल्या २४ तासांत मुंबईसह उपनगरे, ठाणे, नवी मुंबई आणि कोकणात पावसाने अक्षरशः हाहाकार उडाला. मुसळधार पावसामुळे मुंबई आणि उपनगरांतील रस्ते वाहतूक आणि लोकल सेवेवर मोठा परिणाम झाला असून सखल भागात २ ते ३ फुटांपर्यंत पाणी साचले आहे. अनेक ठिकाणी शाळा आणि इमारतींमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

मुंबईत सकाळपासूनच पावसाचा जोर कायम असून दादर, माटुंगा, सायन, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडूप आणि मुलुंड परिसरात पावसाची तुफान बॅटिंग सुरू आहे. अंधेरी सबवेमध्ये सुमारे अडीच फुटांपर्यंत पाणी साचल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक बनला. वीरा देसाई रोडही पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. गोरेगावच्या फिल्म सिटी रोड आणि संतोषनगर परिसरातील मुख्य रस्त्यांवर २ ते ३ फुटांपर्यंत पाणी साचल्याने वाहनचालकांची मोठी कोंडी झाली. पश्चिम द्रुतगती महामार्गावर जोगेश्वरीजवळ एसआरपीएफ कॅम्प समोर २ ते ३ फूट पाणी साचल्याने महामार्गावरील वेग मंदावला. वरळी भागात आणि चेंबूरमध्ये अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचले.

संध्याकाळच्या सुमारास लाखो चाकरमानी घरी जाण्यासाठी निघाले असतानाच पूर्व द्रुतगती महामार्गावर



घाटकोपर, मुलुंड ते ठाणे दरम्यान पावसाचा जोर कमालीचा वाढला. दुपारी पाण्याचा निचरा झाला असला तरी संध्याकाळी पुन्हा सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे ठाण्याच्या दिशेने जाणारी वाहतूक अत्यंत संथ गतीने सुरू आहे.

वसईतील वाघराळ पाड्यात मुसळधार पावासामुळे पाण्याचा प्रवाह इतका तीव्र होता की, ३ दुचाकी आणि २ कार वाहून गेल्या. सुदैवाने, एका कार चालकाने प्रसंगावधान राखून कारमधून उडी मारल्याने त्याचा जीव वाचला. नालासोपाऱ्यातील सेंट्रल पार्क आणि तुळींज परिसरात पाणी साचल्याने अंतर्गत वाहतूक विस्कळीत झाली. कल्याणमध्ये मुसळधार पाऊस झाल्याने शेतकरी जागृत मंडळ शाळेत पाणी शिरले, ज्यामुळे खबरदारी म्हणून विद्यार्थ्यांना तातडीने घरी सोडण्यात आले.

ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या ८ तासांत तब्बल ८२.७६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मुख्य बाजारपेठ, वंदना डेपो, मासुंदा तलाव आणि कोपरी बारा बंगला परिसरात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. दुपारी २.२५ च्या सुमारास समुद्रात आलेल्या मोठ्या भरतीमुळ मुंब्रा भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली. सततच्या पावसामुळे मुंब्रा-शीळ मार्ग पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला असून अनेक वाहने पाण्यात अडकली आहेत.

नवी मुंबईतील सानपाडा परिसरात रस्त्यांना अक्षरशः नदीचे स्वरूप आले असून अनेक वाहने पाण्यात बुडाली आहेत. सायन-पनवेल हायवेवर पाणी साचल्याने मैलोन्मैल वाहनांच्या रांगा लागल्या असून मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. रायगड जिल्ह्यात पावसाची संततधार सुरूच आहे. माणगावजवळील मुगवली फाटा आणि ढालघर फाटा परिसरात मुंबई-गोवा महामार्गावर पाणी आल्याने चालकांना गाडी चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. मुंबई आणि पुण्यात झाडे कोसळण्याच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ झाली आहे. काल चेंबूरमध्ये एका शाळकरी मुलाचा झाड अंगावर पडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. आज मुंबईतील मरोल मिलिटरी रोड आणि जोगेश्वरीतील यादव नगर येथील पॅरामाउंट इमारतीजवळ मोठी झाडे उन्मळून पडली, ज्यामुळे अनेक चारचाकी आणि दुचाकी वाहनांचे मोठे नुकसान झाले. पुण्यातही बाजीराव रस्त्यावर झाड कोसळल्याने वाहतूक पर्यायी रस्त्याने वळवावी लागली. सुदैवाने आज कुठेही जीवितहानी झाली नाही. पालिका प्रशासनाने मान्सूनपूर्व छाटणी केली नसल्याचा संताप नागरिकांनी व्यक्त केला. दरम्यान, उद्याही पालघर जिल्ह्यासाठी हवामान खात्याने रेड अलर्ट कायम ठेवल्याने जिल्हाधिकारी इंदूराणी जाखड यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाड्यांना सुट्टी जाहीर केली आहे. हवामान विभागाने विदर्भ आणि मराठवाड्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, अकोला आणि बुलडाणा या ५ जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे, तर उर्वरित विदर्भाला येलो अलर्ट देण्यात आला आहे.

## विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची बिनविरोध निवड!



मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीत अखेर अपेक्षेप्रमाणे संसदीय परंपरेचा मान राखत शिवसेना (शिंदे गट) नेते सचिन अहिर (डरलहळप हळी) यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून सचिन अहिर यांनी या पदासाठी अर्ज दाखल केला होता. तर दुसरीकडे विरोधी पक्षाकडून म्हणजेच महाविकास आघाडीतर्फे शिवसेना (ठाकरे गट) चे जगन्नाथ अभ्यंकर रिंगणात होते. सभागृहातील संख्याबळ पाहता महायुतीचा विजय निश्चित मानला जात असला, तरी सभागृहाचे कामकाज एकमताने आणि परंपरेनुसार चालावे यासाठी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विरोधी पक्षाला आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत, ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी सभागृहाची इच्छा सर्वानुमते निवडीची असल्याचे सांगत आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची घोषणा केली. विरोधी पक्षाने घेतलेल्या या सामंजस्याच्या भूमिकेनंतर सभागृहात आवाजी मतदान घेण्यात आले आणि सचिन अहिर यांची उपसभापतीपदी एकमताने बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. या ऐतिहासिक क्षणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुती आणि विरोधी पक्षातील सर्व प्रमुख सदस्य सभागृहात उपस्थित होते.

## उघड्या वायरीमुळे नवी मुंबईत दोन तरुणींना रस्त्यावरच करंट

नवी मुंबई : मुंबईसह उपनगरातील मुसळधार पावसामुळे (ठळप) वसईतील वाघराळ पाडा परिसरात बुधवारी भीषण घटना घडली. नाल्याला आलेल्या अचानक पुरामुळे पार्किंगमध्ये उभी असलेली तीन दुचाकी, एक वॅगनआर कार



आणि मारुती कंपनीची एक इको कार पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेली. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. दुसरीकडे नवी मुंबईत पावसाच्या पाण्यातून मार्ग काढत असताना दोन मुलींना वीजेचा धक्का बसल्याने रस्त्यावरच भयानक दृश्य पाहायला मिळालं. सुदैवाने एका धाडसी व्यक्तीच्या प्रसंगावधानतेमुळे दोन्ही मुलीचे प्राण वाचले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

वसईत पावसाच्या पाण्यात अनेक वाहने वाहून गेले, घटनेदरम्यान इको कारमध्ये असलेले चंद्रकांत किणी यांनी प्रसंगावधान राखत धाडसी प्रयत्न केले. पाण्याचा वेग प्रचंड असतानाही त्यांनी दोघांना सुरक्षित बाहेर काढत त्यांचे प्राण वाचवले. त्यांच्या धाडसाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे नाल्याच्या पाण्याची पातळी अचानक वाढल्याने ही घटना घडली. काही क्षणांतच पाण्याच्या प्रवाहाने पार्किंगमधील वाहने अक्षरशः ओढून नेली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, वसई-विरार परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भाग जलमय झाले असून नागरिकांना (पान २ वर....)




### दोषींवर मकोका लागू करण्यासाठी कायदा आणणार

## सोनोग्राफी व आयव्हीएफ केंद्रांवरील गैरप्रकार रोखण्यासाठी विशेष पथकाद्वारे धडक मोहीम सुरू : आरोग्यमंत्री आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात सोनोग्राफी व आयव्हीएफ केंद्रांद्वारे होणारे गैरप्रकार तसेच गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन रोखण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. या पथकांच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांच्या तपासणीची धडक मोहीम राबविण्यात आली असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली.

राज्यात विनापरवाना सुरू असलेल्या आयव्हीएफ केंद्रांवरील कारवाईबाबत सदस्य अबू आझमी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री आबिटकर बोलत होते. यावेळी सदस्य हरीश पिंपळे, अजय चौधरी, योगेश सागर आणि राहुल पाटील यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

मंत्री आबिटकर म्हणाले की, राज्यात आयव्हीएफ उपचार आणि सिझेरियन प्रसूतींचे प्रमाण अनावश्यकरीत्या वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आयव्हीएफ उपचारांचा वापर केवळ वैद्यकीय गरजेनुसारच होण्यासाठी आवश्यक नियमावली तयार करण्यात येणार आहे. अशा प्रकारांमध्ये सहभागी असलेल्या



डॉक्टरांसह संबंधित कर्मचारी आणि रुग्णालय व्यवस्थापनावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, स्त्रीबीज तस्करी, आयव्हीएफ केंद्रांद्वारे होणारे गैरप्रकार आणि गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर अधिक प्रभावी व कडक कारवाई करता यावी, यासाठी मकोका कायद्याच्या तरतुदी लागू करण्यासाठी आवश्यक कायदा आणण्यात येणार आहे.

बदलापूर आणि अंबरनाथ येथे उघडकीस आलेल्या स्त्रीबीज तस्करी प्रकरणात संबंधित डॉक्टरांना अटक करण्यात आली असून, त्यांची वैद्यकीय नोंदणी (सनद) रद्द करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यापुढेही अशा गैरप्रकारात सहभागी आढळणाऱ्या डॉक्टरांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

चंद्रपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बेबीश्युअर क्लिनिक आणि इंदिरा आयव्हीएफ सेंटरची परिमंडळस्तरीय तज्ज्ञ समितीमार्फत तपासणी करण्यात आली. या तपासणीत अनेक त्रुटी आढळून आल्याने राज्यस्तरावरून एआरटी लेव्हल-१ ची नोंदणी प्राप्त होईपर्यंत दोन्ही केंद्रांचे कामकाज तत्काळ बंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या असून संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

## संपादकीय....

### पावसाची बॅटींग

मुंबईसह उपनगरांमध्ये मुसळधार पावसाला सुरुवात झाली असून हवामान विभागाने वर्तवलेला अंदाज खरा ठरला असल्याचं चित्र आहे. रात्रीपासून सुरू असलेला पावसाचा जोर अजूनही कायम असल्यानं शहरातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. तर नवी मुंबईत पुन्हा पावसाला जोरदार सुरुवात झाली आहे. पावसामुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे. तसेच तिन्ही मार्गावरील लोकलची गती मंदावली आहे. सततच्या पावसामुळे काही ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हवामान विभागाने पुढील काही तास मुंबई आणि उपनगरांमध्ये जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता वर्तवली असून नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडताना खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. महापालिकेची यंत्रणा सतर्क असून सखल भागांतील परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. तसेच रेल्वे आणि रस्ते वाहतुकीबाबत अद्ययावत माहितीकडे नागरिकांनी लक्ष ठेवावं, असंही प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे. दरम्यान, मुंबईला पुढील ४ दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईतील काही भागात अतिवृष्टीची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे. ज्यात, २०० मिमी पर्यंत २४ तासात पावसाची नोंद होऊ शकते. दरम्यान, पुढील ७२ तासांत मुंबईत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणक्षेत्रात देखील चांगल्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईवर ओढवलेलं पाणीसंकट कमी होण्यास मदत होईल. दरम्यान, पुढील चार दिवस कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे. त्याचप्रमाणे मराठवाड्याच्या काही भागातही मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर पुढील ४ दिवस मुंबईत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने आज विदर्भातील अनेक जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केले आहे. पूर्व विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर तर पश्चिम विदर्भातील अमरावती आणि अकोला जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केले आहे. त्यामुळे आज विदर्भातील बहुतांशी भागांमध्ये सर्वदूर मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल अशी शक्यता आहे.

# अधिकारी आले, मातीत उतरले अन बळीराजा गहिवरला!

## प्रा. संजय खडसे आणि अजित दिवटेंनी पेरला विश्वासाचा अंकुर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : प्रशासनाचा 'मानवी' चेहरा! कृषी दिनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांनी स्वतः चालवले शेतात तिफन.

पावसाळ्याच्या प्रारंभी शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी व शेतकऱ्यांमध्ये उत्साह वाढवण्यासाठी उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे व तहसीलदार अजित दिवटे यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन स्वतःच्या हाताने बैलजोडीच्या साहाय्याने तिफण धरून पेरणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी सविस्तर संवाद साधत जमिनीतील ओलावा, पेरणीची स्थिती आणि हंगामातील अडचणींची पाहणी केली.

**सध्या तालुक्यात सर्वत्र उपविभागीय अधिकारी डॉक्टर संजय खडसे व तहसीलदार अजित दिवटे यांच्या नावाची चर्चा होत आहे कारण थेट शेतात जाऊन हातात तिफन धरून पेरणी केल्याबद्दल या प्रशासनातील महसूल मधील अधिकाऱ्याबद्दल सर्वोत सकारात्मक व चांगली चर्चा होताना दिसून येत आहे तसेच या कृतीतून महसूल प्रशासन व प्रशासकीय अधिकारी सुद्धा शेतकऱ्यासंदर्भात सकारात्मक असून शेतकऱ्या संदर्भात व शेती संदर्भात अधिकाऱ्यांचा सकारात्मक दृष्टिकोन दिसून आला.सोबत शेतकरी बांधव आणि ग्राम महसूल अधिकारी राहुल देशमुख,स्वप्नील देशमुख,राजेश जाधव,जनार्दन झोरे इत्यादी उपस्थित होते.**

प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष शेतात उतरून शेतकऱ्यांसोबत पेरणी करत असल्याचे दृश्य पाहून परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. तालुक्यात अशा प्रकारे शेतकऱ्यांसोबत बांधावर उतरून शेतीची कामे करणाऱ्या अधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, प्रा. संजय खडसे व तहसीलदार अजित दिवटे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शेतकऱ्या विषयी असलेली आपली आपुलकी स्नेह प्रेम त्यांनी कृतीतून करून दाखवलं

यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे म्हणाले, आम्हीही शेतकरी कुटुंबातून आलो आहोत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सुख-दुःखाच्या भावना आम्हाला चांगल्या प्रकारे समजतात. शेतीसमोरील प्रत्येक संकटात महसूल प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील. शेतकऱ्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य देण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत.

शेतकरी आणि प्रशासन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा हा उपक्रम ठरला असून, शेतीविषयीची आत्मीयता आणि संवेदनशीलता प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिल्याबद्दल दोन्ही अधिकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे व तहसीलदार अजित दिवटे यांनी या परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या व त्यांना मार्गदर्शन केले





# अभ्यासू व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व ॲड. अरविंद बेडगे यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या तुळजापूर तालुका अध्यक्षपदी बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अभ्यासू व्यक्तिमत्त्व ॲड. अरविंद बेडगे यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या तुळजापूर तालुकाध्यक्षपदी बिनविरोध (एकमताने) निवड झाल्याने सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

ड. अरविंद बेडगे यांनी अनेक वर्षांपासून समाज कारणाला प्राधान्य देत विविध क्षेत्रांत सातत्याने कार्य केले आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रेरित करणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी जनजागृती करणे या उपक्रमांमुळे त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्ती बाबत जनजागृती करून वाईट सवयींपासून दूर राहण्याचे मार्गदर्शन करणे, पालकांशी संवाद साधणे तसेच गरजू विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या शैक्षणिक अडचणी जाणून घेऊन आर्थिक व शैक्षणिक मदत करणे, ही त्यांची कार्यशैली विशेष उल्लेखनीय मानली जाते.

आरोग्य क्षेत्रातही त्यांनी विविध आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञांना प्रोत्साहन दिले असून अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. सांस्कृतिक क्षेत्रातही युवक व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन समाज सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध करण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

त्यांच्या या सर्वसमावेशक, प्रामाणिक आणि लोकाभिमुख कार्याची दखल घेत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या

**उत्कृष्ट कार्यप्रणाली करणाऱ्या कार्यकर्त्यांना उत्कृष्ट सेवा पुरस्कार देऊन सन्मानित करणार : बेडगे**

वरिष्ठ नेतृत्वाने त्यांची तुळजापूर तालुकाध्यक्षपदी एकमताने निवड केली आहे. त्यांच्या निवडीमुळे तालुक्यात काँग्रेस संघटना अधिक बळकट होईल आणि जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी ते प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

तुळजापूर सारख्या ऐतिहासिक तालुक्यात पक्षाची जबाबदारी स्वीकारताना मिळालेल्या संधीचे सोने करून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, युवक, महिला आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी समर्पित पणे कार्य करण्याचा निर्धार ड. अरविंद बेडगे यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# उघड्या वायरीमुळे नवी मुंबईत दोन तरुणींना रस्त्यावरच करंट

(पान १ वरून...) आवश्यक नसल्यास घराबाहेर पडू नये तसेच नाले, ओढे आणि पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांपासून दूर राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

नवी मुंबईत गेली तीन दिवस मुसळधार पाऊस कोसळत आहे, अश्यातच नेरुळच्या एलपी जवळ एक धक्कादायक घटना घडली आहे. नेरूळ एल.पी. ब्रिजखाली भूमी अंतर्गत असलेली विद्युत वहिनी उघड्यावर पडली होती. अनेक वाहनाची त्यावरून ये जा झाल्याने त्या वायरवरील कोटिंग निघून गेले असल्याने उघड्या पडलेल्या वायरमध्ये शॉर्टसर्किट झाल्याची घटना घडली. दरम्यान, तेथून जाणाऱ्या १६ ते २० वर्षांच्या दोन कॉलेज विद्यार्थिनी करंटच्या (विद्यूत प्रवाहाच्या) संपर्कात आल्या. विजेच्या धक्याने दोघीही पाण्यात पडल्या होत्या, जीवाच्या आकांतेने ओरडणाऱ्या या तरुणींना पाहून प्रकाश राजपुरोहित याने धाडस दाखवून हातातील गमछा आणि छत्रीच्या सहाय्याने दोघींचे प्राण वाचवले. छत्रीच्या साह्याने तरूणीची बॅग खेचून तरुणींना विजेच्या संपर्कातून बाहेर खेचले. सद्या तरूणींची प्रकृती स्थिर आहे. दरम्यान, याठिकाणी महापौर सुजाता पाटील यांनी भेट देत परिस्थिती पाहणी केली.

# पाच जुलै नंतर शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आता माहिती सरकारने ३० जून पर्यंत कर्जमाफी देणे देईल अशी आश्वासन दिले होते. मात्र प्रतीक्षात पाच जुलै नंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येणार असल्याची माहिती विधानसभाचे कृषी मंत्री दत्ता भरणे यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये माहिती सरकारमध्ये महायुतीला मानवत ही यश मिळाले नाही. माहिती सरकारला विधानसभा निवडणुकीमध्ये चांगली संपादन करण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येईल अशी घोषणा केली होती. मात्र गेल्या दोन वर्षापासून याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत होता. विरोधी पक्षाने या विषयी शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्यासाठी धावेवर धरले होते. अखेर शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली. या योजने संदर्भात शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंत ची कर्जमाफीची पिक कर्ज माफ करण्याची. त्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अंमलबजावणी ३० जून पर्यंत करण्यात येत असे सांगितले होते. मात्र ही तारीख कुठून गेल्यानंतर. मात्र पाच जुलै नंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार असल्याची अधिवेशनामध्ये कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी यांनी दिली व या योजनेचा लाभ राज्यातील ५५ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून त्यांना शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# नांदकर माध्यमिक विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील नांदकर येथील माध्यमिक विद्यालयाने यंदाही दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला असून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळवून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवा आयाम दिल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी माजी उपसरपंच मनोज पाटील यांच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी दहावीच्या परीक्षेत यश मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, वह्या आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच शाळा व्यवस्थापनाच्या वतीनेही गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामुळे शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन तसेच परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या यशामागील विविध घटकांवर प्रकाश टाकण्यात आला. विद्यार्थ्यांची मेहनत, जिद्द, चिकाटी आणि अभ्यासावरील निष्ठा यासोबतच शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि शाळेतील शैक्षणिक वातावरण यामुळे हे यश शक्य झाल्याचे मान्यवरांनी सांगितले. मुख्याध्यापक शैलेश सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांनी नियमित अध्यापन, वेळोवेळी चाचण्या, शंका निरसन सत्रे तसेच वैयक्तिक मार्गदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांना सक्षम तयारी करून दिली. शाळा व्यवस्थापनाचे पाठबळ आणि शिक्षकांची समर्पित वृत्ती यामुळेच शाळेने शतप्रतिशत निकालाची परंपरा कायम राखल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. नांदकर माध्यमिक विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशामुळे पडघा परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून शाळेच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. शाळेची ही यशस्वी वाटचाल इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

यावेळी आमदार शांताराम मोरे, युवासेना तालुकाप्रमुख अजय मोरे, जिल्हा परिषद सदस्य कृष्णा वाकडे, उपतालुकाप्रमुख भगवान पाटील, देवा ग्रुप फाऊंडेशनचे सचिव तानाजी मोरे, माजी लोनाड सेवा सहकारी संस्थेचे सभापती किरण थळे, पोलीस गणेश भोईर, पोलीस पाटील हरिदास काळण, माजी सरपंच विलास जाधव, जयराम दळवी, निलेश कोळी, सुरज खंडागळे, अतिश जाधव, मयूर दळवी, अंकेत दळवी, संकेत घरत, महेश वाळंज, गणेश जाधव, प्रतिक घरत, जयवंत घरत, अविनाश जाधव, सचिन कोनकर, कुणाल पाटील, कैलास पाटील, अविनाश घरत तसेच मुख्याध्यापक शैलेश सोनवणे, शिक्षिका अनुराधा शिंगोळे, शिक्षिका भारती जावळे, शिक्षक नवनाथ गायकर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंद्रठाणा येथील सुपुत्र शेख गुलाम उस्मान यांना क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्काराने' सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब, प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : शेख गुलाम उस्मान इंद्रठाणा ता जि लातूर यांना महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन यांच्या मार्फत यंदाचा मनाचा ' क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले समाज रत्न पुरस्कार २०२६ नुकताच प्रदान करण्यात आला आहे.

शेख गुलाम उस्मान हे लाड़ली फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आहेत.

तसेच महाराष्ट्र पोलिस मित्र सोशलअसोशियशन ( महाराष्ट्र राज्य ) मराठवाड़ा संपर्क प्रमुख आहेत व भारतीय जनता पार्टी युवा नेता म्हणुन कार्यरत आहेत.अशी त्यानी विविध प्रकारची पदे भूषविली आहेत. त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.




लातूरचे माजी खासदार प्रा. डॉ. ॲड. सुनीलजी बळीराम गायकवाड साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त संपन्न झालेल्या कार्यक्रमात मराठवाडा शिक्षक आमदार श्री विक्रम बप्पा काळे यांच्या उपस्थितीत शनिवार दि.२७ जून २०२६ रोजी भालचंद्र ब्लड बँक, लातूर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला.कार्यक्रमाचे अध्यक्ष, रामचंद्र तांदळे, माजी खासदार सुनिल गायकवाड साहेब, शिक्षक आमदार विक्रम बप्पा काळे, सिने अभिनेत्री मैथिली वारंग, रमाईकार डॉ.गायत्री रामटेके,स्वाती पुणेकर, बालकलाकार सिफा पवार, प्रमुख पाहुणे सुरेखा पाटील , बालाप्रसाद सोमानी,

ह भ प महादेव महाराज आडसूळ कळंबकर, विशेष सहकार्य उषाताई धावारे, सुरेखा घोडके, सहारा शेख, जान्हवी सोनसळे,कल्पना बाबर, छाया कळसे, विनायक काळे, उद्धव जाधव, चंद्रकांत वायाळ, गुलाम शेख, शिद्दीक सय्यद, पत्रकार संतोष सोनवणे, आकाश कांबळे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज मांदळे सर यांनी केले.या कार्यक्रमाचे आयोजक व संयोजक नियोजन कमिटीचे प्रमुख व महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनचे संस्थापक सचिव सुफी सय्यद शमशोद्दीन हे होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपुरात प्रशासनाकडून अतिक्रमण हटाव मोहीम सुरू

## पंढरपूर नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्यावतीने संयुक्तपणे अतिक्रमण हटाव मोहीम सुरु








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा शुद्ध एकादशी २५ जुलै २०२६ रोजी असून, आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपुरात येतात. येणाऱ्या वारकरी भाविकांना तसेच स्थानिक नागरिकांना पंढरपूर शहरात रहदारीचा कोणताही त्रास होऊ नये. यासाठी आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्यावतीने संयुक्तपणे अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे १८ ते २० लाख भाविक दर्शनाला येतील असा अंदाज आहे. या पार्श्वभूमिवर गर्दीच्या ठिकाणी तसेच मंदिर व परिसरातील अतिक्रमणे काढण्यास प्रशासनाने मंगळवार दिनांक ३० जून पासून अतिक्रमण मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह २५ पोलीस व नगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांचा पथकात समावेश असून, हे पथक जेसीबी, ट्रॅक्टर आणि टेम्पोसह रस्त्यावर उतरून अतिक्रमणावर कारवाई करत आहे.

मंगळवार दिनांक ३० जून पासून छत्रपती शिवाजी चौक ते अर्बन बँक, अर्बन बँक ते इंदिरा गांधी चौक, इंदिरा गांधी चौक ते सावरकर चौक तसेच भाई राऊळ पुतळा चौक ते छत्रपती शिवाजी चौक (स्टेशन रोड) येथील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. पंढरपूर शहरात अतिक्रमण केलेल्या व्यापाऱ्यांना व विक्रेत्यांना अतिक्रमण काढण्याबाबतच्या सूचना नगरपालिका प्रशासनाने दिल्या होत्या, मात्र सदर अतिक्रमण संबंधितांनी काढले नाही. त्यामुळे कारवाई करावी लागत आहे. शहरातील सर्वच भागात अतिक्रमणाची कारवाई पोलीस प्रशासन व नगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येणार असल्याचेही, प्रांताधिकारी सचिन इतापे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत ढगळे यांनी सांगितले.

# निफाड नगरपंचायतचे उगलमुगले सेवा निवृत्त




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा विभागात व्हॉलमन पदावर कार्यरत असलेले कर्मचारी श्री. प्रमोद बाळकृष्ण उगलमुगले यांनी २८ वर्षांची प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवा पूर्ण करून सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यानिमित्त त्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा दिनांक ३० जून २०२६ रोजी निफाड नगरपंचायत कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

याप्रसंगी श्री. उगलमुगले यांच्यासोबत अनेक वर्षे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या मनोगतातून त्यांच्या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व सहकार्यशील स्वभावाच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या २८ वर्षांच्या सेवाकाळातील अनेक जुन्या-नव्या आठवणींना उपस्थितांनी उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला

यावेळी नगरपंचायतीतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्री. प्रमोद उगलमुगले यांचा भेटवस्तू देऊन सत्कार केला. कार्यक्रमास नगरपंचायत चे मुख्याधिकारी धिरज भामरे , सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश; सांगोला आगारास पाच नवीन एसटी बसेस मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सांगोला आगारास पाच नवीन एसटी बसेस मंजूर झाल्या असून त्या पुढील आठवड्यात सांगोल्यात दाखल होत आहेत. श्च

सांगोला आगार हा सोलापूर-सांगली महामार्गावरील महत्त्वाचा आगार आहे. येथून दररोज अनेक गावांमध्ये, तालुक्यांमध्ये आणि जिल्ह्यांमध्ये प्रवासी वाहतूक सुरू असते. मात्र, बसांची संख्या अपुरी पडल्याने प्रवाशांना अनेकदा गैरसोय सहन करावी लागत होती. विशेषत: शेतकरी, विद्यार्थी, महिल आणि रोजंदारी कामगारांसाठी ही समस्या अधिक जाणवत होती. या पार्श्वभूमीवर आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी परिवहन मंत्री मा.ना. प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. श्च्या पाठपुराव्यास यश मिळाले असून पुढील आठवड्यात पाच बसेस सांगोल्यात दाखल होणार आहेत.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगोला विधानसभा मतदारसंघातील मूलभूत सुविधांवर भर दिला आहे. बससेवेच्या विस्तारासाठी त्यांनी परिवहन मंत्री मा.ना. प्रताप सरनाईक आणि संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. सांगोला तालुक्यातील गावागावातील प्रवाशांना चांगली सेवा मिळावी, यासाठी मी सतत प्रयत्नशील राहीन, असे आमदार देशमुख यांनी यावेळी सांगितले. श्च

नवीन बसेस मंजूर करून घेतल्याबद्दल आगारप्रमुख आणि कर्मचाऱ्यांनी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे आभार मानले. या बसेसमुळे सांगोला ते सोलापूर, कोल्हापूर, पुणे आणि इतर ठिकाणांच्या बससेवा अधिक सुधारणार आहेत. यामुळे प्रवासी क्षमता वाढेल आणि वेळापत्रक अधिक नियमित होईल.

सांगोला तालुक्यातील नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून आता सकाळी आणि संध्याकाळी अधिक बसेस उपलब्ध होतील. विद्यार्थ्यांना आणि बाजाराला जाणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.या नवीन बसेस आधुनिक सुविधायुक्त असल्याचे सांगण्यात आले आहे. यावेळी बोलताना आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले की, येत्या काळात आणखी बसेस आणि नवीन मार्गांसाठी प्रयत्न सुरू आहेत. जनतेला चांगली सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी सतत प्रयत्न चालूच राहतील.

सदरच्या नविन बसेस सांगोला आगारास मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री मा.ना.प्रताप सरनाईक यांच्यासह ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

# कृषी दिनानिमित्त जिल्हा परिषदेत शेतकरी व उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव; आधुनिक शेतीसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, आत्मा सोलापूर व जिल्हा परिषद सोलापूर, कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, अधिकारी, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ कृषी तज्ज्ञ, कृषी निविष्ठा विक्रेते आणि जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, कृषी व पशुसंवर्धन, दुग्धशाळा समितीचे सभापती रामप्पा चिवडाशेट्टी, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अँड. अमृता वाघे, जिल्हा परिषद सदस्य नेताजीभाऊ खंडागळे, शिवमूर्ती सिद्धाराम, लखन साहेब, कुमार काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, आत्मा सोलापूरचे प्रकल्प संचालक कांताप्पा खोत शुक्राचार्य भोसले, कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे, उपविभागीय कृषी अधिकारी देवेंद्र ढगे तालुका कृषी अधिकारी दक्षिण सोलापूर अवधूत मुळे, तालुका कृषी अधिकारी उत्तर सोलापूर श्री रामचंद्र माळी व त्यांचे अधिनस्त सर्व अधिकारी कर्मचारी विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आत्मा सोलापूरचे प्रकल्प संचालक कांताप्पा खोत यांनी प्रास्ताविक करत कृषी दिनाचे महत्त्व, कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि शेतकरी कल्याणासाठी सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पीक स्पर्धेत यश संपादन केलेल्या शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी स्वावलंबन योजना अंतर्गत लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांचाही गौरव करण्यात आला. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना वृक्ष रोप,सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

याचबरोबर कृषी विभागात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शासनाच्या कृषी योजनांची प्रभावी अंमलबजावणी, शेतकरी हितासाठी केलेले उल्लेखनीय कार्य आणि उत्कृष्ट प्रशासकीय सेवेसाठी त्यांचा गौरव करण्यात आला.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले साहेब यांनी मार्गदर्शन करताना प्रगतशील शेतकऱ्यांनी इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून प्रगत तंत्रज्ञानाच्या प्रसारामध्ये योगदान देणे बाबत आवाहन केले.

कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून सोलापूर कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेष तज्ज्ञ अमोल शास्त्री यांनी एल निनो काळात आपत्कालीन पीक व्यवस्थापन व सोयाबीन व तूर लागवडीची पंचसूत्री तसेच खरीप हंगामाचे नियोजन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. बदलत्या हवामानात आधुनिक शेती पद्धती, पीक व्यवस्थापन, उत्पादनवाढ आणि शाश्वत शेतीबाबत त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी उपस्थित शेतकऱ्यांना कृषी दिनाच्या शुभेच्छा देत, कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी शासनाच्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अँड.अमृता वाघे यांनी

मार्गदर्शन करताना अमृता वाघे म्हणाल्या, एक राजा राज्य चालवतो, पण एक शेतकरी संपूर्ण देश चालवतो. शेतकरी हा देशाचा अन्नदाता असून त्याच्या कष्टामुळे प्रत्येकाच्या ताटात अन्न पोहोचते. त्यामुळे शेती हा केवळ व्यवसाय नसून देशाच्या अर्थव्यवस्थेचा आणि विकासाचा भक्कम आधार आहे.

समारोपाच्या भाषणात जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांनी, मी स्वतः एक शेतकरी आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाची, वेदनेची आणि तळमळीची मला पूर्ण जाणीव आहे. शेतकरी समृद्ध झाला तरच देशाची खरी प्रगती होईल. जिल्हा परिषद शेतकऱ्यांच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध राहील, असे सांगत शेतकरी बांधवांना कृषी दिनाच्या शुभेच्छा दिल्या.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याण श्रावस्ती यांनी केले, तर कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी व शेतकरी बांधवांचे आभार मानले. कार्यक्रमास कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, आत्मा सोलापूरचे अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्ह्यातील विविध भागांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वटपौर्णिमेनिमित्त डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीचा वृक्षारोपण उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील डोहोळे ग्रुप ग्राम पंचायतीच्या वतीने वटपौर्णिमेचे औचित्य साधत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. आन्हे गावातील स्मशानभूमी व विधी घाट परिसरात वडाच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संरक्षणाचा संकल्प करण्यात आला. या उपक्रमात ग्रामपंचायत कर्मचारी, स्थानिक नागरिक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. वृक्षारोपणासोबतच लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाचे नियमित संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धारही उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी पंचायत अधिकारी परेश सोनावणे यांनी सांगितले की, पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज असून, भावी पिढ्यांना स्वच्छ, हिरवेगार आणि निरोगी वातावरण मिळावे या उद्देशाने ग्रामपंचायतीमार्फत सातत्याने वृक्षारोपणासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. वृक्ष लागवडीबरोबरच त्यांचे जतन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला डोहोळे ग्रुप ग्राम पंचायतीचे प्रशासक, प्रशासकीय समितीचे सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी ग्रामपंचायतीने राबविलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात आले असून, अशा उपक्रमांमुळे पर्यावरणाबाबत जनजागृती होण्यास निश्चितच हातभार लागणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम**

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कार्यामुळे राज्याच्या विकासाला नवी दिशा मिळाली : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी आपल्या कार्यकाळात शेती, सिंचन, उद्योग, शिक्षण, ग्रामीण विकास रोजगारनिर्मिती या क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या धोरणांमुळे महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळाली. असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.




पुढे बोलताना ते म्हणाले की, वसंतराव नाईक यांनी कृषी क्षेत्राला विशेष प्राधान्य दिले. शेतीचे आधुनिकिकरण करण्यासाठी सुधारित बियाणे, सिंचन सुविधा, खतांचा वापर आणि कृषी संशोधनाला त्यांनी चालना दिली. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी योजना राबविल्या. त्यामुळे त्यांना महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे शिल्पकार म्हणूनही ओळखले जाते.

त्यांच्या काळात औद्योगिक विकासालाही मोठी चालना मिळाली. नवीन उद्योग उभारणे,शिक्षणाचा प्रसार, सामाजिक न्याय आणि दुर्बल घटकांच्या कल्याणासाठीही त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले आभार कार्यक्रम अधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी मानले कार्यक्रमास प्राध्यापिका हर्षदा गायकवाड, जनाबाई चौधरी, शितल फुटाणे उपस्थित होते.

**कृषी दिनानिमित्त शेतकऱ्यांचा सत्कार**

**माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जन्मदिन कृषी दिन म्हणून साजरा केला जातो म्हणून किणी गावातील शेतकरी दयानंद घिवारे, विजयकुमार घिवारे व उल्हास घिवारे यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला.**

# नैतिक मूल्ये पाळून व्यवसाय करा : डॉ. विजय कानिटकर

## डॉक्टर्स डे व सी.ए. डे च्या निमित्त सहा डॉक्टर्सचा व दोन सनदी लेखापालांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर प्रतिनिधी : समाजाच्या शारीरिक व आर्थिक स्वास्थ्य रक्षणात डॉक्टर्स व सनदी लेखापालांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते त्यामुळे ती त्यांनी सचोटीने, कर्तव्यबुद्धीने नैतिकता पाळून व्यवसाय करण्याचे आवाहन ज्येष्ठ व सुप्रसिद्ध सर्जन डॉ. विजय कानिटकर यांनी केले.

ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूर व दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी (शिवदारे कॉलेज) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर्स डे व सी.ए. डे च्या निमित्त नामांकित व सामाजिक बांधिलकी पाळून व्यवसाय करणाऱ्या सहा डॉक्टर्सचा व दोन सनदी लेखापालांचा वि.गु.शिवदारे फार्मसी कॉलेजमध्ये आयोजित सत्कार सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचा




अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे होते.

सोलापूर शहरातील ख्यातनाम सनदी लेखापाल (सी.ए.) श्रीधर रिसबुड, सी.ए. चंद्रकांत रच्चा,सोलापूरचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, जनरल फिजिशियन डॉ. राजेंद्र अग्रवाल, कान, नाक, घसा तज्ञ डॉ. विद्याधर बोराडे, हृदयविकारतज्ञ व शल्यचिकित्सक डॉ. रिझवान-उल-हक, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ डॉ. मीनल चिडगुपकर, नवजात शिशु व बालरोगतज्ञ डॉ. प्रशांत गाडे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय मदत कक्ष, सोलापूरचे अध्यक्ष डॉ. अविनाश खांडेकर यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सन्मानचिन्ह, भेटवस्तू, बुके व शाल घालून सत्कार करण्यात आला.

सर्व गौरवमूर्तींनी सत्कारामुळे यापुढे अधिक उत्साहाने व जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे विश्वस्त प्रा. शेटे म्हणाले की, समाजात सचोटीने काम करणाऱ्या माणसांची दखल घेतली जाते त्यांचे कौतुक आवश्यक असते.

प्रारंभी पुरस्कार निवड समितीचे समन्वयक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सत्कारमूर्तींचा परिचय डॉ. आयेशा रंगरेज व प्रा. वैष्णवी गाजूल यांनी करून दिला. मान्यवरांचा सत्कार प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केला. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. डॉ. सोमनाथ पाटील यांनी मानले.

यावेळी कविवर्य मारुती कटकधोंड, जेष्ठ सनदी लेखापाल एस. बी. पांढरे, सिद्धाराम कोथली, म.सा.प. जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, वृत्तपत्र लेखक मंचचे अध्यक्ष फैय्याज शेख, पांडुरंग कुलकर्णी, ड. आर. एस.पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## दरेगाव नागझरी गट ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी संदिप वाघ यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील दरेगाव नागझरी गट ग्रामपंचायतचे उपसरपंच पद रिक्त असलेल्या ग्राम पंचायतीच्या उपसरपंच पदासाठी संदिप वाघ यांची बिनविरोध निवड करण्यात आली ही माहिती ग्राम पंचायत अधिकारी एन बी इंगळे यांनी दिली.

मागील उपसरपंच प्रकाश काळे यांनी इतर सदस्यांना काम करण्याची संधी मिळावी म्हणून स्वखुशीने राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी निवड प्रक्रिया राबवण्यात आली.

सरपंच कोमल रवि मांटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उपसरपंच पदासाठी संदिप वाघ यांचाच एकमेव अर्ज दाखल झाला. सर्व सदस्यांच्या एकमताने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच कोमल रवि मांटे यांनी उपसरपंच पदासाठी संदिप वाघ यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली.

निवड प्रक्रियेनंतर नवनिर्वाचित उपसरपंच संदिप वाघ यांचा ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना शाल,श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

या कार्यक्रमाला सरपंच कोमल रवि मांटे माजी उपसरपंच प्रकाश काळे. समाज कल्याण आयुक्त. दिपक मांटे.माजी सरपंच अविदास बंगाळे . भाजपा नेते प्रभाकर कायंदे शेषराव काळुसे. ग्राम.पंचायत सदस्य. सुरेश बंगाळे. नितेश साबळे. नितीन साबळे. देवानंद कायंदे व सर्व ग्रामपंचायत सदस्य व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते नवनिर्वाचित उपसरपंच संदिप वाघ यांचे ग्रामस्थांच्या वतीने स्वागत व अभिनंदन करण्यात आले.




## वैमानिकापेक्षाही एसटी.चालकाचे काम जोखमीचे असून कौतुकास्पद आहे : प्रा.एम. एम. मस्के

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : वैमानिकांना आपले विमान एका निश्चित दिशेने घेऊन जावे लागते परंतु एसटी बस चालकांना मात्र घाटातील चढ-उतार आणि नागमोडी वळणाचा रस्ता पार करत शहरातील गर्दीतून मार्ग काढत रस्त्यावरून आपल्या निश्चित ठिकाणी प्रवाशांना घेऊन जाण्याचे अत्यंत जोखमीचं काम करावे लागत असून ते कौतुकास्पद आहे.तब्बल ३२ वर्षे एस.टी. बस चालक म्हणून विनाअपघात सेवा करून सातलिंग मस्के यांनी सेवानिवृत्ती घेतली त्याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे असे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ विचारवंत तथा दयानंद महाविद्यालयात सोलापूर येथून सेवानिवृत्त झालेले वरिष्ठ प्राध्यापक एम.एम.मस्के यांनी तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ तुळजापूर आगार येथून एसटी बस चालक म्हणून तब्बल ३२ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झालेले होणाळा तालुका तुळजापूर येथील सातलिंग बलभिम मस्के यांच्या सेवापुर्ती बद्दल परिवहन महामंडळतील कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शुभेच्छा देताना प्राध्यापक एम.एम.मस्के बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या सेवेवर प्रवाशांचा भरवसा असून एसटीचा प्रवास सुखाचा प्रवास अशी विश्वासार्था एसटी बसने जनमानसात निर्माण केली आहे ती केवळ अशा प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यामुळेच. त्यामुळे आजही लाल परीने सामान्य माणसाच्या हृदयात आपले मानाचे स्थान निर्माण केले आहे.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुळजापूरचे आगार प्रमुख महेश रामपुरे हे होते तर प्रमुख पाहुणे लेखाधिकारी सूधिर बामनकर, माझी विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी संजय कदम आदी होते.या प्रसंगी सातलिंग मस्के यांच्या सेवानिवृत्ती निमित्त उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार पुष्पगुछ शाल,फेटा,स्मृतिचिन्ह देऊन भव्य सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन गौतम रणदिवे यांनी केले यावेळी प्रा.डी.डी.मस्के, सहशिक्षक सुनील लोंढे,रिपाइं (आठवले)चे जिल्हा सचिव एस.के. गायकवाड, भिमशाहीर भिमराव सोनवने, विपूल सुरवसे,महामंडळाचे कर्मचारी जे.बी. सिरसट, सोमनाथ कस्तुरे,शहाजी डावरे, नेताजी मुळे, विलास सरवदे सह कर्मचारी हितचिंतक महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खानिवली कृषी तंत्र विद्यालयात महाराष्ट्र कृषी दीन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त भिवंडी तालुक्यातील खानिवली येथील कृषी तंत्र विद्यालयात मंगळवार, दि. १ जुलै २०२६ रोजी विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कृषी क्षेत्राचे महत्त्व, शाश्वत शेतीची दिशा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कृषी दिनाचे औचित्य साधून मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये प्राचार्य व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आधुनिक शेती, कृषी क्षेत्रातील नव्या संधी, शाश्वत शेती पद्धती तसेच शेतकऱ्यांच्या योगदानाचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यालय परिसरात वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे विविध प्रकारची रोपे लावून पर्यावरण संवर्धनाची सामूहिक शपथ घेतली. या उपक्रमातून हरित परिसर निर्माण करण्याचा आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. यावेळी क सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यांनी मिळून महाराष्ट्र कृषी दिन उत्साहात साजरा केला.

यावेळी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना, शेती हा केवळ व्यवसाय नसून जीवनपद्धती आहे. शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी आणि समृद्ध भारत हेच आपल्या सर्वांचे ध्येय असले पाहिजे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. कृषीविषयक जनजागृती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांच्या पसंतीस उतरला. यावेळी प्राचार्य मिलिंद घरत ,उपप्राचार्य जितेंद्र खरे तर आदी शिक्षक उपस्थित होते.

## आटपाडीचे प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्ष उत्तम जाधव यांचा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब प्रतिनिधी/ सुधाकर रणदिवे,तारीख २९ सांगली जिल्ह्यातील आटपाडी शहराचे नवनियुक्त लोकनियुक्त नगराध्यक्ष श्री युटी सर अर्थात सन्माननीय उत्तम जाधव हे कळंब येथे आले असता राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने त्यांचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे प्रदेश सरचिटणीस श्री संतोष भोजने यांच्याकडून शाल, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा देऊन पेढा भरवत,सामान्य शिक्षकांमधून जिल्हा परिषद सेवेत असूनही राजकीय क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवत आटपाडी शहराचे नगराध्यक्ष पद मिळाल्याबद्दल खास सत्कार करण्यात आला. शिक्षण सेवेत कार्यरत असताना श्री युटी जाधव सर हे शिक्षक समिती आणि सांगली जिल्हा शिक्षक बँकेचे चेअरमन म्हणून काम करत असताना शिक्षकांच्या प्रत्येक अडीअडचणीत धावून आल्यामुळेच जिल्ह्यातील आणि तालुक्यातील सर्व शिक्षकांनी त्यांना या निवडणुकीत सहकार्य करून मोठ्या फरकाने आटपाडीच्या नगराध्यक्षपदी बसविले .यावेळी आटपाडी तालुक्यात सेवा बजावून कळंब तालुक्यात बदलीने आलेले शिक्षक सर्वश्री अशोक पांचाळ, महादेव बोंदर, बन्सीलाल मोराळे आसाराम दराडे, दत्तात्रय जाधवर यांनी सरांसमवेत आलेल्या श्री.शामराव ऐवळे, संजय कबीर, श्रीकांतराजे कुंभार, हैबतराव पावणे, अजिनाथ आंधळे, कुमार गुळवे या त्यांच्या सर्व माजी सहकाऱ्यांचा यथोचित सन्मान केला.

**कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद**

**कार्यशाळांमुळे दरवर्षी किमान १०० हून अधिक विद्यार्थ्यांना लाभ**

# स्वेरी अभियांत्रिकीत जपानी भाषा कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या वतीने डिग्री इंजिनिअरिंगच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'जपानी भाषा आणि करिअरच्या संधी' या विषयावर एकदिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना जागतिक रोजगाराच्या संधी, जपानी भाषा, संस्कृती आणि आंतरराष्ट्रीय करिअरविषयी मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यशाळेस 'मोसाईक प्रायव्हेट लिमिटेड'चे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक हिरो इशिदा हे प्रमुख अतिथी व मुख्य वक्ते म्हणून उपस्थित होते. तसेच इंडो-जपान कौन्सिलचे श्रीकांत गुंजाळ यांनी विशेष वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्वेरी या संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, उद्योगाभिमुख कौशल्ये आणि आंतरराष्ट्रीय करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अशा उपक्रमांचे स्वेरीत सातत्याने आयोजन केले जाते. दीप प्रज्वलनानंतर ट्रेनिंग



व इंडस्ट्री इंटरएक्शन अधिष्ठाता प्रा. रविराज माढेकर यांनी प्रास्तविकातून या कार्यशाळेच्या आयोजनाबाबत सविस्तर माहिती दिली. प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना हिरो इशिदा यांनी जपानी भाषा, संस्कृती, शिस्त, कार्यपद्धती आणि जपानी उद्योगविश्वातील संधी याविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी स्वतःच्या अनुभवातून जपानी भाषा आत्मसात करण्याचा प्रवास आणि त्यातून मिळालेल्या यशस्वी संधी विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये जपानी भाषा शिकण्याची उत्सुकता निर्माण झाली. विशेष वक्ते श्रीकांत गुंजाळ यांनी भारत-जपान औद्योगिक संबंध, बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील करिअरच्या संधी, तसेच जपानी भाषा अवगत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या आकर्षक रोजगाराच्या संधींची माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील करिअरसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याचे आवाहन केले. यावेळी परदेशी भाषांचे महत्त्व पटवून देताना व अध्यक्ष स्थानावरून बोलताना उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार म्हणाल्या की, 'जपानसारख्या आंतरराष्ट्रीय प्रगतशील देशाच्या भाषेचे ज्ञान हे विद्यार्थ्यांना भविष्यात त्यांच्या करिअर संदर्भात जागतिक स्तरावर नवी दिशा देऊ शकते. तांत्रिक शिक्षणाबरोबरच परदेशी भाषेचे कौशल्य आत्मसात केल्यास विद्यार्थ्यांसाठी देश-विदेशातील रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात.' असे सांगून परदेशात असलेल्या स्वेरीच्या माजी विद्यार्थ्यांचे उदाहरणे दिली. प्लेसमेंट अधिष्ठाता डॉ. अभिषेक यांनी कार्यक्रमाच्या नियोजन व अंमलबजावणीत मोलाचे सहकार्य केले. पुण्यातील प्रा. राहुल डोले यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मान्यवरांचे प्रेरणादायी मार्गदर्शन, जपानी भाषेचे महत्त्व आणि आंतरराष्ट्रीय करिअरच्या विविध संधींची माहिती यामुळे ही कार्यशाळा अत्यंत यशस्वी ठरली. विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविण्यासाठी अशा दर्जेदार उपक्रमांचे आयोजन करण्याचा स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा सातत्यपूर्ण प्रयत्न भविष्यातही सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सूत्रसंचालन सोनाली कांबळे यांनी केले व ट्रेनिंग व इंडस्ट्री इंटरएक्शन अधिष्ठाता प्रा. रविराज माढेकर यांनी आभार मानले.

**मागील अनेक वर्षांपासून स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विविध आंतरराष्ट्रीय भाषांच्या कार्यशाळांचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे. या कार्यशाळांमुळे दरवर्षी किमान १०० हून अधिक विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे. विशेषतः जपानी आणि फ्रेंच या आंतरराष्ट्रीय भाषांच्या कार्यशाळा यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आल्या असून, विद्यार्थ्यांनी त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे परदेशी भाषा कौशल्य विकसित होण्यास तसेच उच्च शिक्षण, रोजगार आणि आंतरराष्ट्रीय संधींसाठी आवश्यक असलेली भाषिक क्षमता वृद्धिंगत होण्यास मोठी मदत झाली आहे.**